# ८५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

सन्माननीय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, देवतळे या संस्थेची ८५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता** देवतळे येथे संस्थेच्या सभागृहात बोलाविण्यात आली आहे. सभेत खालील विषयांवर विचार विनिमय होईल. तरी सभासदांनी सभेस नियोजित वेळी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## सभेपुढील विषय

१) दुःखवट्याचे ठराव करणे.
२) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
३) सन २०२३-२०२४ सालचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक मंजूर करणे.
४) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२३-२०२४ सालच्या नफा-वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१९-२० सालची सभासदांनी न नेलेली डिव्हीडंड रक्कम रु. ६,५५५.०० रिझर्व्ह फंड खाती वर्ग करण्यांत आली आहे त्यांस मंजुरी देणे.
६) सन २०२४-२०२५ सालासाठी बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.
७) सन २०२४-२०२५ सालासाठी सभासदांचे नॉर्मल क्रेडीट ठरविणे.
८) सन २०२४-२०२५ सालासाठी शासकीय लेखा परिक्षक नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
९) सन २०२५-२०२६ वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासणीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०) सन २०२३-२०२४ या वर्षाच्या शासकीय लेखा परिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
११) सन २०२४-२०२५ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
१२) ८५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१३)मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

देवतळे - वसई
दिनांक : २५-६-२०२४

आपला विश्वासू,
**हरेश्वर नारायण राऊत**
मानद् सचिव

टीप : १) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या पोटनियम क्र. २४(१) प्रमाणे वरील ठिकाणी एक तासानंतर त्याच विषयावर घेण्यात येईल. तहकुबीनंतरच्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. (२) अहवालात नमूद केलेल्या जमाखर्च व ताळेबंद वगैरे विषयाची माहिती ज्या सभासदांस पाहिजे असेल त्यांना दिनांक १३-७-२०२४ पर्यंत कार्यालयात मिळू शकेल. काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सदरहू प्रश्न दिनांक १६-७-२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळात लेखी पाठवावेत. वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य त्या तपशीला अभावी देता येणे शक्य होईलच असे नाही. (३) शासकीय लेखा परीक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल संस्थेच्या दप्तरी पहावयास उपलब्ध आहे. (४) सभेस येताना अहवाल सोबत आणावा. (५) वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजेरीसाठी अर्ज कार्यालयात उपलब्ध आहे.

**सभेस येताना ओळखपत्र दाखविणे जरूरीचे आहे.**



Scanned with ACE Scanner

# ✣ अहवाल वर्ष ८५ वे ✣

## १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४

सन्माननीय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या ८५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमंत्रणास मान देवून आपण उपस्थित राहिला, याबद्दल मला व व्यवस्थापक मंडळास आनंद होत आहे. मी उपस्थितांचे व्यवस्थापक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. संस्थेचा १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेरचा ८५ वा वार्षिक अहवाल, त्या सोबत त्याच कालावधीचा अंतर्गत हिशोब तपासनीसांनी प्रमाणित केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, व्यापारी पत्रक व्यवस्थापक मंडळाच्या वतीने आपणांस सादर करतो. आपण त्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

### भाग भांडवल :

अहवाल वर्षी संस्थेचे एकूण भांडवल रु. ४,७२,१००/- इतके झाले आहे. अहवाल साली सभासद संख्या १००२ आहे.

### ठेवी :

वर्ष अखेरीस संस्थेकडे रु. २४,३८,७७४/- मुदत ठेवी आहेत. संस्थेच्या सभासदांनी, हितचिंतकांनी संस्थेवरील विश्वास, आस्था व सहकार्याच्या भावनेने आपल्या ठेवी संस्थेकडे गुंतविल्याबद्दल ठेवीदारांचे मनःपूर्वक आभार मानतो. अहवालवर्षी संस्थेकडे रु. २१,६४९/- च्या बचत ठेवी जमा आहेत.

### रिझर्व्ह फंड व इतर फंड :

अहवाल वर्षारंभी वरील फंडाची रक्कम रु. ९,९३,०९,२०१/- होती. त्यात वाढ होऊन वर्ष अखेरीस रु. १०,२३,४४,३३१/- एवढी झाली. या फंडाची झालेली वाढ संस्थेच्या स्थैर्यात व विश्वासात भर घालणारी आहे.

### गुंतवणूक :

अहवाल वर्षारंभी रु. ९,३१,२१,८५७/- ची गुंतवणूक होती. त्यात अहवाल वर्षी वाढ होऊन वर्षअखेर रु. ९,४७,३५,२५०/- एवढी गुंतवणूक झाली आहे.

### व्यवस्थापक मंडळ :

अहवाल सालात व्यवस्थापक मंडळाच्या १४ सभा झाल्या. त्यात मासिक सभा, तातडीची सभा व विशेष सभेचा अंतर्भाव आहे. उपसमितीच्या ५ सभा झाल्या. या सर्व सभांना कार्यकारी मंडळाचे सदस्य नियमितपणे उपस्थित राहिले. संस्थेच्या प्रगतीत त्यांनी उपयुक्त सहभाग व सहकार्य केले. गणसंख्येच्या अभावी एकही सभा तहकूब करावी लागली नाही.

### सभासद कर्जे :

अहवाल वर्षारंभी सभासदांकडून रु. १,१८,५००.०० कर्जे येणी होती. वर्ष अखेरीस एकूण रु. ८०,६१५.००



Scanned with ACE Scanner

कर्ज रक्कम सभासदांकडून येणे बाकी राहिली आहे. कार्यकारी मंडळाने शेतीसाठी कर्ज वाटप चालू केले आहे. त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.

## ऑडीट ( लेखा परिक्षण ) :

संस्थेचे सन २०२३-२०२४ सालचे शासकीय लेखा परिक्षण मे. मनिष शिंदे अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंट यांनी केले असून लेखा परिक्षण अहवाल मिळालेला आहे. संस्थेस या वर्षी "अ" वर्ग देण्यांत आला आहे. त्याचा अहवाल सोबत जोडला आहे.

सन २०२३-२०२४ सालचे अंतर्गत लेखा परिक्षण संस्थेने नेमलेले मे. जेसिका अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंट, वसई ह्यांनी पूर्ण केले असून त्यांचा अहवाल सोबत जोडला आहे.

## विक्री केंद्र :

संस्था देवतलाव, होळी बाजार, किरवली, मुळगांव व उंबरगोठण येथे शेती वस्तूंचे पाच डेपो व होळीबाजार, किरवली, उमेळे व वासळई येथे किराणा मालाची चार दुकाने चालवित आहे. देवतलाव येथे शेती बागायती व जीवनोपयोगी वस्तुंशिवाय लोखंड, पाईप, लोखंडी पत्रे, सिमेंट, सिमेंट पत्रे, सिमेंट ब्लॉक्स, निलकमल प्लास्टीक खुर्च्या / टेबले व इतर उत्पादने तसेच पतंजलीची उत्पादने, पी.व्ही.सी. पाईप, पाईप फिटींगचे सामान, ठिबक सिंचन पद्धत व तुषार संचाचे सामान, भारत गॅस विक्री, गॅस करिता लागणाऱ्या सुरक्षा ट्युब व उपकरणे, मिश्रणखत विक्री केंद्र, भारत पेट्रोलियम कंपनीचे वंगणतेल व सिन्टेक्स पाण्याच्या टाक्यांची विक्री चालवित आहोत. संस्थेची देवतलाव, माणिकपूर येथे भारत गॅस विक्री केंद्रे आहेत.

व्यवस्थापनाने देवतलाव येथे ड्रायफ्रूटस् मार्ट चालू करून ड्रायफ्रूटस्, कुकीज, चिक्की व अमूल चितळे या कंपनीची उत्पादने विक्रीस ठेवलेली आहेत. **V-Guard** या नामांकित कंपनीची गॅस गीझर व इतर उत्पादने विक्रीस ठेवलेली आहेत. तरी सभासदांनी याचा लाभ घ्यावा.

तसेच व्यवस्थापनाने देवतलाव येथे **प्रधानमंत्री भारतीय जन औषधी व जेनेरिक औषधी विक्री केंद्र** चालू केले आहे. संस्थेचे सभासद व ग्राहकवर्गाला कमी किमतीची व चांगल्या दर्जाची औषधे उपलब्ध करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. ज्यामुळे गंभीर आजाराने ग्रस्त रूग्णाला उपचारातील खर्च कमी होईल. तसेच व्यवस्थापनाने देवतलाव येथील मागील बाजूस १०० ते १२५ लोकांची बैठक व्यवस्था असलेला नवीन बँक्वेट हॉल बांधला आहे. **नवीन बँक्वेट हॉल** वाढदिवस, बारसे, सेवानिवृत्ती इत्यादी लहान समारंभ, सभा, कंपनीच्या कॉन्फरन्स मिटींगसाठी उपलब्ध आहे. सभासदांनी नवीन सभागृहाचा लाभ घ्यावा.

संस्थेने सामान्य माल, किराणा माल, भारत गॅस माल व मिश्रण खत माल या विभागांत अहवाल वर्षी रु. ६७,९१,८३,२९८/- ची खरेदी केली आहे. तसेच रु. ७२,६९,२४,१५२/- ची विक्री केलेली आहे. अहवाल वर्षी संस्थेस व्यापारी नफा रु. १,८१,२३,८९१/- झालेला आहे व निव्वळ नफा रु. ६४,९४,७८४.७५ झालेला आहे.

अहवाल वर्षी संस्थेने सभासद व ग्राहक यांना दि. १ नोव्हेंबर २०२३ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ या सणासुदीच्या कालावधीमध्ये व्यवस्थापनाने किराणामाल माल खरेदीवर ग्राहकांना ३% प्रमाणे सूट देण्याचे प्रस्तावित



Scanned with ACE Scanner

केले होते. सभासदांनी व ग्राहकांनी या संधीचा फायदा घेतला. अहवाल वर्षी संस्थेने सभासदांना गतवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील दि. १ नोव्हेबर २०२३ ते दि. ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधीसाठी सभासदांना ८ किलो साखर प्रति किलो रु. ३४/- या सवलतीच्या दराने दिली होती.

## सेवक वर्ग :

संस्थेस लाभलेल्या कार्यक्षम सेवकवर्गाने दिलेल्या उत्तम सहकार्यामुळे संस्थेला आजची प्रगती करणे साध्य झाले आहे व यापुढेही त्यांचे असेच सहकार्य लाभत राहील अशी आशा बाळगतो. संस्थेचे एकूण ६१ कर्मचारी आहेत. त्याचा खातेप्रमाणे तपशील येणे प्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कार्यालयीन कर्मचारी | : | ०७ |
| जनरल शॉप कर्मचारी | : | २२ |
| भारत गॅस कर्मचारी | : | १३ |
| चालक | : | ०५ |
| लॉरीवरील हमाल | : | १२ |
| हातगाडीवरील हमाल | : | ०२ |
| **एकूण** | : | **६१** |

सर्व कर्मचारीवृंदासाठी अहवाल वर्षी पगार, सानुग्रह अनुदान म्हणून रु. १,८१,५६,८५१/- खर्च करण्यात आले आहेत. या सर्व खर्चास आपण मंजूरी द्यावी ही विनंती. अहवाल वर्ष अखेर कर्मचारीवृंदाकडून रु. २,१४,६८३/- कर्ज येणे बाकी आहे.

## शेती मार्गदर्शन :

आपल्या सभासदांना व परिसरातील शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीची माहिती मिळावी तसेच शेती व शेतीपूरक व्यवसायात त्यांनी प्रगती करावी या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी '**एकात्मिक सेंद्रीय शेती व थेट विक्रीतून समृद्ध शेतकरी**' ह्या विषयावर शेती मार्गदर्शन गुरूवार दि. ३० नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ४.३० वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते **मा. श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती बोडके**, कृषी भूषण, राष्ट्रीय पुरस्कार माण (बोडकेवाडी), मुळशी, पुणे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.

## संस्थेचा ८४ वा वर्धापन दिन :

आपल्या संस्थेच्या ८४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेने देवतलाव येथे बांधलेल्या नवीन विक्री केंद्र व नवीन बॅक्वेट हॉल आणि प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी विक्री केंद्राचे उद्घाटना वसई-विरार महानगरपालिकेचे **महापौर श्री. प्रविण चि. शेट्टी** व संस्थेचे **माजी चेअरमन श्री. सुरेश ह. चौधरी** ह्यांच्या हस्ते शनिवार दि. २० एप्रिल २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता देवतलाव येथे झाले. त्यावेळी संस्थेच्या नवीन विक्री केंद्रात श्री सत्यनारायणाची पुजा आयोजित करण्यात आली होती व संध्याकाळी ४.०० वाजता **डॉ. सुरेश पाटील**, मानसोपचार तज्ञ (Psychiatrist) यांचा '**निरोगी आणि आनंदी जीवन**' यावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या सभासदांनी व ग्राहकांनी दोन्ही कार्यक्रमास उपस्थित राहून तिर्थप्रसादाचा व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.



Scanned with ACE Scanner

## आंबा महोत्सव :

आपल्या संस्थेच्या आवारात दि. ३१ मे २०२४ ते रविवार दि. २ जून २०२४ या दिवसात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. आंबा महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दि. ३१ मे २०२४ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता **कृषिभूषण श्री. यज्ञेश सावे** ह्यांच्या हस्ते झाले. महोत्सवामध्ये विविध प्रकारचे आंबे बघण्यास व विक्रीस उपलब्ध होते.

तसेच आंब्याची कलमे व विविध प्रकारची शेती अवजारेसुद्धा विक्रीस उपलब्ध होती. संस्थेच्या सभासदांनी व परिसरातील ग्राहकांनी महोत्सवास चांगला प्रतिसाद दिला.

## बिल्डिंग दुरूस्ती :

देवतलाव येथे मागील बाजूस असलेले NCDC गोडावून जीर्ण झाल्यामुळे ते पाडून त्याजागी संस्थेचे सभासद व ग्राहकांसाठी नवीन विक्री केंद्र व पहिल्या मजल्यावर लहान सभागृह (नवीन बँक्वेट हॉल) बांधले. सदर इमारतीस व इतर कामासाठी एकूण रुपये ७१,७८,३०४/- खर्च झालेला आहे.

## सभासद कल्याण निधी :

अहवाल वर्षी ४५ सभासदांना रु. ४,३५,२००/- त्यांच्या विनंतीवरून गंभीर आजारात सभासद कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## कर्मचारी कल्याण निधी :

अहवाल वर्षी संस्थेने ४ कर्मचाऱ्यांना रु. ३०,०००/- त्यांच्या विनंती वरून गंभीर आजारात कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## सभासदांनी खालील सूचनांची नोंद घ्यावी :

१) **नवीन भाग दाखले तयार असून सभासदांनी आपले भाग दाखले संस्थेच्या मुख्य कार्यालयातून दुपारी ३ ते ५ ह्या वेळेत घेऊन जावेत.**

२) सभासदांनी आपल्या डिव्हिडंडची रक्कम स्वीकारावी. तीन वर्षावरील न घेतलेल्या डिव्हिडंडची रक्कम सहकारी कायद्याप्रमाणे रिझर्व्ह फंडात वर्ग करावी लागते.

३) सभासदांच्या जुन्या पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास नवीन पत्ता कळवावा. तसेच आपला मोबाईल नंबर संस्थेस कळवावा.

४) ज्या सभासदांनी ओळखपत्र देण्यासंबंधी अजूनही फोटो दिलेले नसतील अशा सभासदाने पोष्ट टिकिटसाईज आपले दोन फोटो कार्यालयात देऊन आपले ओळखपत्र लवकरांत लवकर घेऊन जावे.

५) ओळखपत्र दाखविल्याशिवाय सभासदांना सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६) सभासदांनी वारस नोंद केली नसल्यास वारस नोंद करावी.



Scanned with ACE Scanner

# ✣ नफा वाटणी ✣

संस्थेस अहवाल वर्षी निव्वळ नफा रु. ६४,९४,७८४.७५ एवढा झालेला आहे. त्याची विभागणी पोटनियमानुसार करण्यांत आलेली आहे. बाकी उरलेल्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे व्यवस्थापक मंडळाने सुचविली असून आपण त्यास मान्यता द्यावी ही विनंती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड | २५% | रु. | १६,२३,६९६.०० |
| २. | स्पेशल इम. रिझर्व्ह फंड | १०% | रु. | ६,४९,४७८.०० |
| ३. | इमारत फंड | ५% | रु. | ३,२४,७३९.०० |
| ४. | बुडीत फंड | ५% | रु. | ३,२४,७३९.०० |
| ५. | सभासद डिव्हीडंड १५% प्रमाणे | | रु. | ७०,८१५.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ६% | रु. | ३,८९,६८७.०० |
| ७. | कामगारवृंद कल्याण निधी | ३% | रु. | १,९४,८४४.०० |
| ८. | मानधन | | रु. | १४,४००.०० |
| ९. | धर्मदाय फंड | | रु. | २,००,०००.०० |
| १०. | कृषि विकास फंड | | रु. | ३,००,०००.०० |
| ११. | इमारत फंड | | रु. | २२,००,०००.०० |
| १२. | आकस्मित फंड | | रु. | २,०२,३८६.७५ |
| | | | **एकूण रुपये** | ६४,९४,७८४.७५ |

## क्रियाशील सभासद :

क्रियाशील सभासद म्हणजे संस्थेचा असा सभासद जो संस्थेच्या सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व सभासदांच्या अधिमंडळाच्या किमान एका सभेला उपस्थित आहे आणि खालील बाबींपैकी एका बाबीची पूर्तता केली आहे असा भागधारक सभासद.

१) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किमान एक वेळा अल्प मुदत कर्ज (रोख रकमेच्या स्वरूपात अथवा अन्य प्रकारे) अथवा मध्यम मुदत कर्ज घेतले अथवा दिर्घ मुदत कर्ज घेतले असले पाहिजे.

२) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये कमीत कमी रु. १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) ठेव सलग कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीकरीता ठेवली असली पाहिजे.

३) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये संस्था पुरवित असलेल्या उपरोक्त सेवाखेरीज इतर सेवांचा किमान एकदा उपभोग घेतला असला पाहिजे.



Scanned with ACE Scanner

## दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत

| २०२२-२०२३ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,७७,४०,७९५.०० | आरंभी शिल्लक माल | | १,७८,३७,५६९.०० |
| | **माल खरेदी** | | |
| १८,७३,०३,२०५.०० | सामान्य माल | १६,९७,३७,४६४.०० | |
| ३,५७,३०,२१५.०० | किराणा माल | ३,६०,५७,१५६.०० | |
| ४९,७८,८४,३८०.०० | भारत गॅस माल | ४६,४०,३४,६६७.०० | |
| ९४,५१,८७३.०० | मिश्रण खत माल | ९३,५४,०११.०० | |
| | | | ६७,९१,८३,२९८.०० |
| | **खर्च** | | |
| १२,५९,५८५.०६ | सामान्य माल | ८,७१,४६०.६० | |
| ९,५०,८९१.०० | किराणा माल | ८,७५,०४३.०० | |
| १,३६,८५,८८३.०० | भारत गॅस माल | १,३२,७३,७५४.७५ | |
| ६,१५,८३१.५० | मिश्रण खत माल | ६,३४,०८४.०० | |
| ---- | प्रोफेशनल टॅक्स | २,५००.०० | |
| | | | १,५६,५६,८४२.३५ |
| ३७,९७,१३५.१५ | वाहतूक खाते | | ३२,०६,६१९.०४ |
| | **वेतन** | | |
| ३३,३३,७८२.०० | सामान्य माल | ३४,६१,३०२.०० | |
| २६,७८,८९७.०० | किराणा माल | ३०,०२,५६८.०० | |
| ६५,३८,८०९.०० | भारत गॅस माल | ५५,८४,१७१.०० | |
| ९,८०,४८४.०० | मिश्रण खत माल | १०,४०,०१४.०० | |
| १४,८२,८०७.०० | वाहतूक खाते | १४,९१,१३२.०० | |
| | | | १,४५,७९,१८७.०० |
| १४,७६,६५९.०० | रिफंड / डेबीट नोट | | १५,३१,०७९.०० |
| १,७५,६७,९६८.८२ | व्यापारी नफा | | १,८१,२३,८९१.२७ |
| ८०,२४,७९,२०१.०३ | एकूण | | ७५,०१,१८,४८५.६६ |





## व्यापारी पत्रक

| २०२२-२०२३ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **माल विक्री** | | |
| १९,५०,६५,५७१.२५ | सामान्य माल | १७,६०,१०,७६८.५५ | |
| ३,९२,७५,४०२.०० | किराणा माल | ३,९०,५८,७८०.२५ | |
| ५३,२७,९६,७१३.७१ | भारत गॅस माल | ५०,२६,१३,७२३.०० | |
| १,०३,३८,५५२.५६ | मिश्रण खत माल | ९२,४०,८७९.८० | |
| | | | ७२,६९,२४,१५१.६० |
| | **बारदान विक्री** | | |
| ४,४०८.०० | किराणा माल | ६,४०१.०० | |
| ५,४२७.०० | मिश्रण खत माल | १५,६६३.०० | |
| | | | २२,०६४.०० |
| | **रिकामी डबे विक्री** | | |
| ---- | किराणा माल | १,९०१.०० | १,९०१.०० |
| ३५,९५,३४४.५० | वाहतूक खाते | | २४,६६,५२२.३५ |
| ३५,६०,२१३.०१ | रिफंड / क्रेडीट नोट | | ३७,२७,५८५.७१ |
| १,७८,३७,५६९.०० | अखेर शिल्लक माल (३१-३-२०२४) | | १,६९,७६,२६१.०० |
| ८०,२४,७९,२०१.०३ | एकूण | | ७५,०१,१८,४८५.६६ |



Scanned with ACE Scanner

## दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत

| २०२२-२०२३ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| १,८०,२७२.०० | ठेवींवरील | १,९९,५३४.०० | |
| १,५१३.०० | बचत खात्यावरील | ८३३.०० | |
| १,२२,४४१.०० | व्याज (बँक अकौंटवरील) | ८१,९७१.०० | |
| | | | २,८२,३३८.०० |
| | **खर्च** | | |
| १४,७८,३०६.३१ | कार्यालयीन | १२,९३,४३४.५९ | |
| २४,१०,५६९.०० | वेतन - कार्यालयीन | २६,५७,६८८.०० | |
| ४,२३,१३२.०० | कामगार प्रॉ. फंड - सोसायटी वर्गणी | ४,४८,४७५.०० | |
| १०,००,७२३.०० | फॅमिली पेन्शन - सोसायटी वर्गणी | ९,७०,१११.०० | |
| १,८८,५४२.०० | इ. एस्. आय. सी. - सोसायटी वर्गणी | १,६६,७३७.०० | |
| ५५,२७०.०० | प्रॉ. फंड ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ५८,५८६.०० | |
| ५५,२७०.०० | लिंक इन्शुरन्स ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ५८,५८६.०० | |
| ८,७०,८७४.०० | कामगारवृंद घरभाडे | ८,६१,८५९.०० | |
| ७,२०,३०५.०० | कामगारवृंद बोनस | ६,९१,७२०.०० | |
| | | | ७२,०७,१९६.५९ |
| | **कर व शुल्क** | | |
| २८,८८,९८२.८५ | आयकर | २६,८२,३९१.९७ | |
| १,१७,०९९.०० | घरपट्टी | २,२२,०९०.०० | |
| १०,६९,४७७.७३ | वॅट टॅक्स | ---- | |
| १२,६१०.०० | जमिनधारा खर्च | १२,६१०.०० | |
| ६,८९,६४९.०० | ऑडीट फी | ६,३६,२१९.०० | |
| १५,६८७.०० | TCS चार्ज | ---- | |
| ---- | GST टॅक्स | ५१,६३९.०० | |
| | | | ३६,०४,९४९.९७ |

(पान नं. १२ वर)





## नफा तोटा पत्रक

| २०२२-२०२३ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| ५४,२८,३१८.८८ | गुंतवणूकीवरील | ५५,९२,९७७.७० | |
| ३७,४९२.०० | कर्ज रकमेवरील | ७५,२१५.५० | |
| १,०७०.०० | बँक अकौंट वरील | १,६६६.०० | |
| | | | ५६,६९,८५९.२० |
| | **भाडे जमा** | | |
| ८,३६,९००.०० | सभागृह | १३,८३,९६४.५० | |
| ५,६४,५८८.०० | शॉप रेंट | ५,५३,१७६.०० | |
| | | | १९,३७,१४०.५० |
| | **इतर जमा** | | |
| ५२,८००.०० | प्रशासकीय फी | ५३,०००.०० | |
| १,१४०.०० | शेअर ट्रान्सफर फी | ९६०.०० | |
| ४८०.०० | वारस बदल फी | १९०.०० | |
| १,४६,०००.०० | मॅन्डेटरी इन्स्पेक्शन फी | २,२२,८००.०० | |
| १,९८,२००.०० | सर्व्हिस चार्ज व इन्स्टॉलेशन फी | २,६६,३००.०० | |
| | | | ५,४३,२५०.०० |
| ---- | न्यू इंडिया विमा दावा रक्कम | | १,३७,६६७.०० |

(पान नं. १३ वर)



Scanned with ACE Scanner

## दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत

| २०२२-२०२३ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १० वरुन) | | |
| | **इतर खर्च** | | |
| ९,८१,७९६.७५ | झीज | १३,९४,९५१.४३ | |
| ६,४७,८६५.०० | विमा हप्ता | ५,७७,४७१.०० | |
| १,२७,७९८.०० | टेलिफोन बिल | १,२०,८९९.०० | |
| १९,१३,७८३.०० | बिल्डींग दुरुस्ती | ७,२५,५०२.०० | |
| ५,८७,७१०.०० | विद्युत बिल | ६,८२,५९१.८० | |
| १,२२,६५४.०० | सभागृह खर्च | १,९१,७५४.०० | |
| १,७१,२९५.४५ | बँक चार्जेस | १,२२,७२२.७३ | |
| १,९२,३७०.५० | वार्षिक सभा खर्च | २,४०,०९६.५० | |
| ४९,१४०.५० | सुट | ६६,०२१.०० | |
| १,०१,८८१.०० | का. मं. मा. मिटींग खर्च | १,०७,५५४.०० | |
| १,२०,५२९.०० | प्रवास खर्च | १,२९,९०५.०० | |
| १,८३,६९९.०० | जनरेटर खर्च | ३,८१,७८८.२० | |
| ५१,५६०.०० | संगणक खर्च | १,१४,७०४.०० | |
| ४५,०००.०० | भत्ता | ५७,०००.०० | |
| २६,००,०००.०० | खर्च तरतूद | ३५,००,०००.०० | |
| १,६५,८३७.०० | वेतन फरक | ---- | |
| | | | ८४,१२,९६०.६६ |
| ४,१२,०७०.०० | प्रिंटींग स्टेशनरी | | ४,०९,५७८.०० |
| ४०,५९,२७५.६१ | निव्वळ नफा | | ६४,९४,७८४.७५ |
| २,४८,३४,९५७.७० | एकूण | | २,६४,११,८०७.९७ |





## नफा तोटा पत्रक

| २०२२-२०२३ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. ११ वरुन) | | |
| १,७५,६७,९६८.८२ | व्यापारी नफा | | १,८१,२३,८९१.२७ |
| २,४८,३४,९५७.७० | एकूण | | २,६४,११,८०७.९७ |



Scanned with ACE Scanner

## दि. ३१ मार्च २०२४

| २०२२-२०२३ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,९०,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | | १,९०,०००.०० |
| | वसूल भाग भांडवल | | |
| ४,७२,१००.०० | सभासद | | ४,७२,१००.०० |
| | फंड | | |
| २,६०,२१,५८८.१२ | रिझर्व्ह फंड | २,७०,४४,८६२.१२ | |
| १,०२,८९,१५३.४३ | स्पेशल इम. रिझर्व्ह फंड | १,०६,९५,०८१.४३ | |
| ३ २५ ५०२.०८ | डिव्ही. इक्वी. फंड | ३,२५,५०२.०८ | |
| १,२५,०७,७१७.९० | बिल्डिंग फंड | १,२७,१०,६८१.९० | |
| ४,२६,८६,०००.०० | बिल्डिंग फंड -भारत गॅस गोडावून | ४,३८,८६,०००.०० | |
| ६१,६२,५७९.८७ | बुडीत फंड | ७१,६५,५४३.८७ | |
| ५,१६,६६०.०० | बिल्डिंग रिझर्व्ह फंड | ५,१६,६६०.०० | १०,२३,४४,३३१.४० |
| | इतर फंड | | |
| २०,२२,०२९.४२ | धर्मदाय फंड | २२,२२,०२९.४२ | |
| १६,६८,४२०.३५ | नोकर ग्रॅच्युईटी फंड | १५,१२,५६७.३५ | |
| ४६,२४,८८१.४६ | कृषी विकास फंड | ४८,२४,८८१.४६ | |
| ९५,१७,३०६.६३ | आकस्मित तरतूद | ९६,९९,३५७.२४ | |
| २३,४५,४९८.०० | कामगार कल्याण निधी | २४,३७,२७६.०० | |
| ३८,८५,०३६.०० | सभासद कल्याण निधी | ३६,९३,३९३.०० | |
| २५,०००.०० | निवडणूक निधी | २५,०००.०० | २,४४,१४,५०४.७७ |
| | ठेवी | | |
| २५,६१,७०७.०० | मुदत ठेव | २४,३८,७७४.०० | |
| ३९,३४७.०० | सेव्हिंग ठेव | २१,६४९.०० | २४,६०,४२३.०० |
| | देणी | | |
| २०,८१०.०० | डिव्हिडंड सभासद | २०,३९०.०० | |
| १२,०६,९८३.५० | अनामत | १२,५३,७८१.४० | |
| १५,५३,२६२.८७ | व्यापारी देणे | ५०,९७,०१४.४६ | |
| ३२,२३,४००.८२ | ॲडव्हान्स | ३८,२४,३६७.७९ | |
| ४,६४,९५२.०० | सभागृह ॲडव्हान्स | ४,८७,७५५.०० | |
| २,६७,५७०.७५ | कामगार ॲडव्हान्स | ८,३२५.०० | |

(पान नं. १६ वर)



वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि: देवतळे-वसई. ८५ वा वार्षिक अहवाल

## अखेर ताळेबंद

| २०२२-२०२३ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | शिल्लक कॅश | | |
| १९,८०५.३० | हाती शिल्लक | ३२,७७५.९९ | |
| १,२४,०४४.०४ | करंट अकाऊंट बँक ऑफ इंडिया १०१० | ३,१५,३३८.६१ | |
| २१,८१,४३४.०९ | करंट अकाऊंट बॅसीन कॅथॉ. बँक ६८१ | २७,४५,२८५.६८ | |
| १,४८,९५५.२७ | करंट अकाऊंट ठाणे बँक ०३५/१२ | ३,८०,३९१.२४ | |
| ९,४२२.२६ | सेव्हिंग अकाऊंट ठाणे बँक ०३१/१३ | १०,००१.२६ | |
| ३९,०८३.०० | सेव्हिंग अकाऊंट बँक ऑफ इंडिया ६७२४ | ४०,१७०.०० | |
| १९,३३,८०४.२६ | वसई विकास सह. बँक लि. २२०६ | २२,९३,८९८.२८ | |
| १,३५,४८७.३० | करंट अकाऊंट आय.सी.आय.सी.आय. | १,६०,६५९.०४ | ५९,७८,५२०.१० |
| | गुंतवणूक जनरल | | |
| १,३४,४१०.०० | शेअर्स - सहकारी संस्था | १,४५,४१०.०० | |
| ८,३७,९०९.०० | बँक ऑफ इंडिया, बंगली शाखा | ८,७९,३७३.०० | |
| २,९६,६८,९७७.०० | वसई विकास सह. बँक लि. | २,६४,१९,४७७.०० | |
| २,६६,९२,६०१.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह. बँक वसई | ३,३१,२२,८८८.०० | |
| १,७८,५९,४६८.०० | बॅसीन कॅथॉ. बँक | २,०८,७१,९३५.०० | |
| ९४,८२९.०० | सहकार भूषण पुरस्कार ठेव - (ठाणे जिल्हा मध्य.बँक) | ९४,८२९.०० | |
| ३३,३२,४४२.०० | स्पे. इम. रिझर्व्ह फंड - ठाणे जिल्हा बँक | २५,०२,८५५.०० | |
| २०,००,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह. बँक वसई टर्म डि. | २०,००,०००.०० | ८,६०,३६,७६७.०० |
| १,२५,०१,२२१.०० | गुंतवणूक कामगारवृंद ग्रॅच्यूएटी फंड | | ८६,९८,४८३.०० |
| १,१८,५००.०० | सभासद कर्ज | | ८०,६१५.०० |
| | येणी | | |
| २१,११,०२१.९६ | डिपॉझिट | २०,४५,५२१.९६ | |
| १०,७५,२३२.०० | सिमेंट ॲडव्हान्स | २६,२०,७५५.०० | |
| १०,५०,५४३.०० | ऑईल ॲडव्हान्स खाते | ९,२८,०५६.०० | |
| ३३,९००.०० | भारत गॅस स्टॅम्प ड्यूटी | १,०४,०००.०० | |
| २,१७,८०३.०० | कामगारवृंद कर्ज | २,१४,६८३.०० | |
| ६५,७३,७५९.९७ | व्याज येणे | ६६,३९,४६६.६१ | |

(पान नं. १७ वर)



Scanned with ACE Scanner

## दि. ३१ मार्च २०२४

| २०२२-२०२३ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १४ वरुन) | | |
| १,४९,०३८.४१ | ऑईल ॲडव्हान्स | १,६७,९९५.४१ | |
| ---- | सिमेंट ॲडव्हान्स | १२,२८२.०० | |
| ९९,७४८.५० | भारत गॅस ॲडव्हान्स | १,२७,६०५.५० | |
| | | | १,०९,९९,५१६.५६ |
| | **इतर देणी** | | |
| ३,९९,९७७.४० | तरतूद | ११,१८,८५०.४० | |
| २,४९,८१३.०० | व्याज देणे | ३,४८,१०१.०० | |
| ४,२३२.०० | टी. डी. एस. प्रोफेशनल फी | ३,२७२.०० | |
| १३,०००.०० | कामगारवृंद प्रोफेशनल टॅक्स | ११,०२५.०० | |
| १,५५,३७५.०० | नोकरवृंद प्रॉव्हिडंड फंड | १,४३,५१९.०० | |
| ८२,६४५.०० | कामगारवृंद पेन्शन फंड | ७६,३३९.०० | |
| १९,३५०.०० | नोकरवृंद इ.एस.आय.सी. फंड | १६,३७३.०० | |
| ११,०००.०० | वेतन ॲडव्हान्स | ६१,३७१.०० | |
| ३०,५०५.५० | टी. डी. एस. कॉन्ट्रॅक्टर | ---- | |
| १,३८,३४३.७० | जी. एस. टी. पेबल | ---- | |
| ५,८०८.०० | कामगार कल्याण निधी | ७,३०८.०० | १७,८६,१५८.४० |
| ७७,७२५.५० | **येणी नफातोटा खाती वर्ग** | | ७७,७२५.५० |
| ४०,५९,२७५.६१ | **निव्वळ नफा** | | ६४,९४,७८४.७५ |
| १३,८७,०३,३४८८२ | **एकूण** | | १४,९०,४९,५४४०८ |

ह्याच तारखेच्या आमच्या तपासणी अहवालातील शेऱ्यांस पात्र राहून
मे. मनिष शिंदे अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंटस् करिता
( श्री. मनिष शिंदे )
मालक





## अखेर ताळेबंद

| २०२२-२०२३ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०२३-२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १५ वरुन) | | |
| १,००,९९४.८४ | भारत गॅस एस. व्ही. टी. व्ही. डिपॉझिट | ९३,७००.१६ | |
| १४,८६,६८५.७४ | भारत गॅस ॲडव्हान्स | १४,३६,२५५.५५ | |
| ९४,४५६.०० | एफ. टी. एल. खाते | १६,८८४.०० | |
| ४०,०००.०० | बिर्ला व्हाईट सिमेंट खाते | ---- | |
| ५,२०,९८६.९४ | टी.डी.एस. बँक येणे | ---- | |
| ७,१३,७०७.०८ | व्यापारी उधारी | ११,६७,७०९.७९ | |
| २९,३७८.६० | अनामत | ३८,४५८.५० | |
| ६,००,६११.५७ | ॲडव्हान्स | ११,४६,८३६.३० | |
| १,६७,७९५.२४ | टी. डी. एस. कंपनी येणे | ५३,६६२.४६ | |
| २०,२२१.०० | कामगार येणे | ६६,६५९.०० | |
| ---- | टी.डी.एस. कॉन्ट्रक्टर | १,१०४.५० | |
| ---- | जी.एस.टी.पेबल | ७९,७८७.३२ | १,६६,५३,५४०.१५ |
| ३७,३८,९०४.०० | **स्थावर मालमत्ता** | | १,०४,५२,२४४५० |
| | इमारती (देवतळे ४, दुकाने ५, गोदाम ३) | | |
| | जमीन (देवतळे, वाघोली) | | |
| २५,१६,८९५.०० | **वाहने** | | २०,१३,५१४.०० |
| | (३ ट्रक, ३ टेंपो, ३ जीप, २ दुचाकी व १ स्कार्पिओ) | | |
| ३५,६०८.०० | **मशिनरी** | | २,९७,७५३.५० |
| | (संगणक २३, प्रिंटर १४, यूपीएस १२, जनरेटर २) | | |
| १३,३९,७९०.०० | **डेडस्टॉक** | | १७,७४,८६८.०० |
| ३,७१९.२६ | **लायब्ररी** | | ३,३४७.३३ |
| ४,८१,७३४.०० | विमा दावा येणे | | ---- |
| १,९१०.६० | ओव्हरड्राफ्ट १०५ वसई विकास | | ५,९०५.०० |
| ७७,७२५.५० | **देणी नफातोटा खाती वर्ग** | | ७७,७२५.५० |
| १,७८,३७,५६९.०० | **शिल्लक माल** | | १,६९,७६,२६१.०० |
| १३,८७,०३,३४८८२ | **एकूण** | | १४,९०,४९,५४४०८ |

वरील ताळेबंद सोसायटीची सद्य परिस्थिती बरोबर दर्शवित आहे.

| गौतम द. वर्तक | हरेश्वर ना. राऊत | समीर ज. पाटील | आशय ह. राऊत |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक | मा. सचिव | व्हाईस चेअरमन | चेअरमन |



Scanned with ACE Scanner

# वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि: देवतळे-वसई.

## सन २०२४-२५ सालचे खर्चाचे अंदाज पत्रक

| क्र. | खर्चाचा तपशील | सन २०२३-२४ चा अंदाज | सन २०२३-२४ चा प्रत्यक्ष खर्च | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२४-२५ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किरकोळ खर्च | १५,००,०००.०० | १२,९३,४३५.०० | | २,०६,५६५.०० | १५,००,०००.०० |
| २ | सेवक वर्ग खर्च | ६५,००,०००.०० | ५९,७०,७६२.०० | | ५,२९,२३८.०० | ७०,००,०००.०० |
| ३ | सभा खर्च | ३,००,०००.०० | ३,४७,६५०.०० | ४७,६५०.०० | | ३,५०,०००.०० |
| ४ | प्रवास खर्च | १,५०,०००.०० | १,२९,९०५.०० | | २०,०९५.०० | १,५०,०००.०० |
| ५ | विमा खर्च | ७,००,०००.०० | ५,७७,४७१.०० | | १,२२,५२९.०० | ७,००,०००.०० |
| ६ | टेलिफोन खर्च | १,५०,०००.०० | १,२०,८९९.०० | | २९,१०१.०० | १,५०,०००.०० |
| ७ | वीज व जनरेटर खर्च | ८,००,०००.०० | १०,६४,३८०.०० | २,६४,३८०.०० | | १०,००,०००.०० |
| ८ | सभासद व ग्राहक सूट | १,००,०००.०० | ६६,०२१.०० | | ३३,९७९.०० | १,००,०००.०० |
| ९ | बँक चार्जेस | २,००,०००.०० | १,२२,७२३.०० | | ७७,२७७.०० | १,५०,०००.०० |
| १० | तरतुदी | २२,००,०००.०० | ३५,००,०००.०० | १३,००,०००.०० | | ३०,००,०००.०० |
| ११ | व्याज देणे | ३,५०,०००.०० | २,८२,३३८.०० | | ६७,६६२.०० | ३,००,०००.०० |
| १२ | प्रिंटींग व स्टेशनरी | ४,५०,०००.०० | ४,०९,५७८.०० | | ४०,४२२.०० | ४,५०,०००.०० |
| १३ | घरपट्टी व जमीनधारा | २,००,०००.०० | २,३४,७००.०० | ३४,७००.०० | | ३,००,०००.०० |
| १४ | आयकर | २५,००,०००.०० | २६,८२,३९२.०० | १,८२,३९२.०० | | २०,००,०००.०० |
| १५ | लेखापरीक्षण शुल्क | ७,००,०००.०० | ६,३६,२१९.०० | | ६३,७८१.०० | ७,००,०००.०० |
| १६ | इमारत दुरुस्ती | २०,००,०००.०० | ७,२५,५०२.०० | | १२,७४,४९८.०० | २०,००,०००.०० |
| १७ | घसारा | १५,००,०००.०० | १३,९४,९५१.०० | | १,०५,०४९.०० | १५,००,०००.०० |
| १८ | संगणक खर्च | २,००,०००.०० | १,१४,७०४.०० | | ८५,२९६.०० | २,००,०००.०० |
| १९ | सभागृह व इतर खर्च | ५,००,०००.०० | १,९१,७५४.०० | | ३,०८,२४६.०० | ४,५०,०००.०० |
| २० | नफा | ५०,००,०००.०० | ६४,९४,७८४.७५ | १४,९४,७८४.७५ | | ६०,००,०००.०० |
| | एकूण | २,६०,००,०००.०० | २,६३,६०,१६८.७५ | ३३,२३,९०६.७५ | २९,६३,७३८.०० | २,८०,००,०००.०० |



Scanned with ACE Scanner

## वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि: देवतले-वसई.

### सन २०२४-२५ सालचे उत्पन्नाचे अंदाज पत्रक

| क्र. | उत्पन्नाचा तपशील | सन २०२३-२४ चा अंदाज | सन २०२३-२४ चा प्रत्यक्ष उत्पन्न | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२४-२५ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यापारी नफा | १,९०,००,०००.०० | १,८१,२३,८९१.०० | | ८,७६,१०९.०० | १,९५,००,०००.०० |
| २ | व्याज जमा | ५०,००,०००.०० | ५६,६९,८५९.०० | ६,६९,८५१.०० | | ५५,००,०००.०० |
| ३ | इतर उत्पन्न | ५,००,०००.०० | ५,४३,२५०.०० | ४३,२५०.०० | | ६,००,०००.०० |
| ४ | सभागृह भाडे | १५,००,०००.०० | १९,३७,१४०.०० | ४,३७,१४०.०० | | २४,००,०००.०० |
| | एकूण | २,६०,००,०००.०० | २,६२,७४,१४०.०० | ११,५०,२४१.०० | ८,७६,१०९.०० | २,८०,००,०००.०० |



Scanned with ACE Scanner

# ✣ आम्ही आपले आभारी आहोत ✣

- मा. खासदार डॉ. हेमंत विष्णु सावरा, लोकसभा सदस्य, भारत सरकार.
- मा. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर व श्री. क्षितिज ठाकूर, विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
- जिल्हा उपनिबंधक श्री. शिरीष कुलकर्णी साहेब व त्यांचे सहकारी.
- वसई तालुक्याचे उपनिबंधक श्री. अमर शिंदे व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई तालुक्याचे तहसिलदार श्री. अविनाश कोष्टी व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई तालुक्याचे प्रांत अधिकारी श्री. शेखर घाडगे साहेब व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई-विरार शहर महानगरपालिका आयुक्त श्री. अनिलकुमार पवार साहेब व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई-विरार शहर महानगरपालिका माजी महापौर श्री. प्रविण शेट्टी साहेब.
- ठाणे जिल्हा मध्य. सहकारी बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग व वसई शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बँक ऑफ इंडिया, बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बसीन कॅथॉ. बँकेचे चेअरमन व जनरल मॅनेजर, कर्मचारीवृंद व बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई विकास बँकेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्ग.
- पालघर जिल्ह्याचे कृषि अधिकारी व त्यांचे सहकारी.
- कृषि उत्पन्न बाजार समिती वसई यांचे चेअरमन व संचालक मंडळ.
- वसई तालुक्याचे गटविकास अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई पंचायत समितीचे कृषी अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई तालुका पुरवठा अधिकारी व त्यांचे सहकारी.
- शासकीय प्रमाणित लेखा परिक्षक श्री. मनिष नरेंद्र शिंदे व त्यांचे सहकारी.
- भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय व्यवस्थापक, उरण विभागाचे टेरिटरी मॅनेजर व आपल्या विभागाचे बीपीसीएल कंपनीचे अधिकारी कु. सुमीत सिंग तसेच त्यांचे सहकारी.
- महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळाचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लिमिटेडचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- ए.सी.सी. कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- हैद्राबाद कंपनीचे मार्केटिंग अधिकारी व त्यांचे सहकारी.
- जैन पाईप कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- JSW CEMENT & JSW STEEL कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे युनिट, बिर्ला व्हाईट सिमेंट कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- सिन्टेक्स कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- TATA STEEL कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व सेवाभावी संस्था व त्यांचे पदाधिकारी.
- संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक, ठेवीदार व हितचिंतक यांनी आस्थेने संस्थेवर नितांत प्रेम व विश्वास दाखवून संस्थेला उत्कर्षाच्या भक्कम पायावर उभे केल्याबद्दल.
- संस्थेचा कर्मचारीवृंद.

आपणा सर्वांकडून लाभत असलेले सहकार्य उत्तरोत्तर वाढत जावो हीच सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहे.

!! जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

देवतळे, वसई.
दि. : २५-६-२०२४

आशय हरेश्वर राऊत
चेअरमन

# ✣ अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल ✣

आम्ही, वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., देवतळे - वसई, जि. पालघर, या संस्थेचे दिनांक ३१ मार्च २०२४ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्या दिवशी पूर्ण होणाऱ्या सहकार वर्षाचे व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक अंतर्गत लेखा परिक्षक म्हणून पाहिले असून, त्याबाबत अहवाल देतो की,

१) आमच्या हिशोब तपासणीच्या उद्देशासाठी आमच्या पूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले ताळेबंद पत्रक, व्यापारी पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आणि आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यांत आलेल्या खुलाशावरुन व आम्ही जोडलेल्या शेरे पत्रकातील शेरे लक्षात घेता हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती सर्व माहिती देतात आणि

अ) ताळेबंद पत्रक संस्थेची ३१ मार्च २०२४ अखेर खरी व योग्य परिस्थिती दाखविते व

ब) नफा - तोटा पत्रक संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर होणाऱ्या सहकार वर्षाचा खरा व योग्य नफा दाखवितो.

देवतळे - वसई.
दिनांक : १२-०६-२०२४

मे. जेसिका अँड असोसिएटस्
चार्टर्ड अकौंटंटस् करिता
( सीए. जेसिका फरोज )
(मालक)
अंतर्गत लेखा परिक्षक.



Scanned with ACE Scanner

# ✣ वैधानिक लेखा परिक्षक अहवाल ✣

नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९(३) पाहा)

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.

देवतळे, ता. वसई, जि. पालघर

**विषय :** नेमणूकपत्र संदर्भ क्र. वशेविकासमो/०५४/मास दि. २२-०८-२०२३
प्रमाणिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१) वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., वसई यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२४ पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरणपत्र तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामध्ये मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षण जे उघड न केलेले आणि रक्कम आतील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरिक्षकांच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.



Scanned with ACE Scanner

**अभिप्राय**

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य ते उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारण भारतात मान्य केला आहे

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२४

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि

**इतर कायदेशीर आणि नियामक बाबीवरील अहवाल**

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

८) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हांस असे आढळून आले आही की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) **आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो :**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरण पत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यावर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखांचे ताळेबंद पत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हांला जरुरीचा आहे त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) लेखापरिक्षण चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला 'अ' वर्ग मिळाला आहे.

देवतळे - वसई.
दिनांक : २२-०६-२०२४

**मे. मनिष शिंदे अँड असोसिएट**
चार्टर्ड अकौंटंट

**( सीए मनिष नरेंद्र शिंदे )**
शासकीय प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था



Scanned with ACE Scanner